महा मेट्रो

PUNE METRO

महामेट्रोतर्फे पिंपरी-चिंचवड मधील रिक्षा चालकांसाठी सुरक्षित वाहतुकीसाठी जनजागृती

पुणे ,३१ ऑगस्ट २०१८ :महामेट्रो , पिंपरी चिंचवड वाहतूक पोलीस , पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक फाटा चौक , डॉ .बाबासाहेब आंबेडकर चौक , आणि महावीर चौक चिंचवड या तिन्ही ठिकाणी रिक्षाचालक यांना सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीने जनजागृती , आणि मार्गदर्शन करण्यात आले . यावेळी महामेट्रोचे पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गिका एक चे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक गौतम बिऱ्हाडे, यांनी रिक्षाचालकांनी वाहतूक करताना कोणते नियम पाळले पाहिजेत , काय खबरदारी घेतली पाहिजे याची माहिती सांगितली .

तसेच वाहतूक जनजागृती मध्ये पिंपरी चिंचवड वाहतूकशाखेचे सहायक पोलीस आयुक्त श्री . पाटील आणि महामेट्रोचे सुरक्षा अधिकारी किशोर करांडे आणि महामेट्रो मार्गिका क्रमांक १ चे मॅनेजर बापूसाहेब गायकवाड , पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उप अभियंता श्री . पाटील आणि कनिष्ठ अभियंता श्री . शेटे , पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक निंबाळकर आणि भोसरी पोलीस निरीक्षक ओबासे, निगडी पोलीस निरीक्षक श्री . घोगरे , हिंजवडी पोलीस निरीक्षक श्री . म्हसवडे , सांगवी पोलीस निरीक्षक श्री . जाधव , चिंचवड पोलीस निरीक्षक पाटील, यांनी रिक्षा चालकांशी संवाद साधला .

वाहतुकीच्या दृष्टीने अनेक उपाययोजना केल्या आहेत . हॅरिस ब्रिज (बोपोडी) ते संत मदर तेरेसा ब्रिज (चिंचवड) या दरम्यान महामेट्रोचे काम सुरु आहे . वाहतूक सुरळीत राहावी , अपघात होउ नये , म्हणून रिक्षा चालकांनी व दुचाकी चालकांनी खालील सूचनांचे पालन करावे असे महामेट्रो तर्फे आवाहन करण्यात आले .

वाहन चालकांसाठी खालील प्रमाणे सूचना :

१) ग्रेड सेपरेटर मध्ये वाहने वेगाने चालवू नये .

२) ओव्हरटेक करू नये .

३) मध्यपान करून रिक्षा/वाहने चालवू नये .

४) मेट्रोच्या कामाच्या ठिकाणी कामाची यंत्र सामुग्री आत बाहेर केली जाते . त्यावेळेस आजूबाजूची वाहने पाहून सावधानता बाळगून चालकांनी वाहने चालवावीत .

५) वाहन चालवताना मोबाईल वर बोलू नये इत्यादी.

महामेट्रो सातत्याने सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीने प्रयन्त करीत आहे . तसेच मेट्रो वाहुतुकीसाठी अंत्यत संवदेनशील असून यापुढेही. वेळोवेळी जनजागृती आणि मार्गदर्शन करण्यात येणार आहे . यावेळी रिक्षा व दुचाकी वाहनचालकांना चालकांसाठी महामेट्रोतर्फे माहिती पत्रके वाटण्यात आली.

या मार्गदर्शनात स्वराज्य रिक्षा स्टॅन्ड अध्यक्ष पिराप्पा धोत्रे , महाराष्ट्र रिक्षा स्टॅन्ड अध्यक्ष नजीर गुलाब शेख, शिव मल्हार रिक्षा स्टॅन्ड अध्यक्ष नितीन साखरे , बुरुटे रिक्षा स्टॅन्ड पिंपरी अध्यक्ष किशोर केसवानी , एकता रिक्षा स्टॅन्ड अध्यक्ष आस्ताद रामपुरे , डॉ . आंबेडकर रिक्षा स्टॅन्ड चौक राहुल अण्णा धोत्रे , हिंद रिक्षा संघटना नाना गाडे , बाबा आढाव रिक्षा संघटना आत्माराम जावडे , साईबाबा रिक्षा संघटना अध्यक्ष सुरेश चिले, राजू वक्रनारायण इत्यादी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष यांनी सहभाग घेतला .